REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# पेशवे काळात विधवा व सती स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन



**अमोल आकात**
**मु. पो. सेलु, ता. जि. परभणी**

## सारांश

धर्मशास्त्राचा स्वार्थी दृष्टीने विषर्यास करुन हिंदु स्त्रियांचा अनन्वित छळ केला. महाराष्ट्रात तरी या छळाची सतराव्या आणि अठराव्या शतकांत परिसिमा झाली. स्त्रीला विद्रुप करुन मेलेल्या नवऱ्याच्या तिरडीला तिचे केस बांधल्याशिवाय तो स्वर्गाला जाऊ शकत नसे.

### प्रस्तावना

धर्माच्या नावावर स्त्रियांच्या मनावर निष्ठेचा संस्कार केला जाई. आई तेच शिकवी. देव धर्म तेच सांगे. त्या काळी बालविवाह रुढ होते. शिवाय विवाह हा धार्मिक विधी होता. त्यामुळे एकदा विवाह झाला की तो वज्रलेप समजला जाई इतका की एखादी आठ-नऊ वर्षाची मुलगी विधवा झाली तरी तिच्या पुर्नविवाहाचा विचार पापमय समजला जात असे.

इ.स. १८०० च्या सुमाराची गोष्ट पेशव्यांचे सेनापती परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या १/९ वर्षाच्या मुलीवर दुर्दैवाने वैधव्याचा प्रसंग ओढावला. त्या बालविधवेच्या पुर्नविवाह व्हावा अशी पेशव्यांकडून खटपट सुरु झाली. या विवाहाला शंकराचार्यांनी संमती द्यावी म्हणुन बाजीराव पेशव्यांनी बराच प्रयत्न केला. पण शंकराचार्यानी संमती दिली नाही. पेशव्यांनी काशी येथील पंडितांचे शेकडो सह्यानिशी पुर्नविवाहास संमतीदर्शक पत्र आणविले. त्यानंतर शंकराचार्यांनीही आपली संमती असल्याचे कळविले. पण त्या वेळी तो पुर्नविवाह झाला नाही. पुण्यातील काही ब्राम्हण मंडळी भाऊंच्या बायकोला भेटली. धर्माच्या अधःपाताला कुठुन आणि कसे थांबवाने हे त्यांनी बरोबर हेरले. विधवेच्या पुर्नविवाहाची अशा प्रकारची नविन चाल आपण पाडु नये असा भाऊंच्यापाशी हट्ट धरण्याविषयी त्यांनी तिला सांगीतले. या हट्टास यश येऊन सनातन्यांचा विजय झाला. पण लोकमान्य टिळकांच्या मते, या गोष्टीस दंतकथेखेरीज काही पुरावा नाही. पेशव्यांच्या रोजनिशीत हा मजकुर नाही. आणि पटवर्धनांच्या दप्तरातही याचा पत्ता नाही असे बापुसाहेब कुरुंदवाडकरांसारख्या अशा त्या घराण्यातील पुरुषाचे आणि वासुदेवशास्त्री खरे यांचे म्हणणे आहे. बिचाऱ्या आजाण बालविधवा म्हणजे काय हे कळण्यापुर्वीच वैधव्याची कुऱ्हाड पडुन दीनपणे जीवनाला सामोऱ्या जात. असे जीवन जगणाऱ्या स्त्रिया त्या काळी उच्चवर्णीयांत बऱ्याच असत. व्रतस्त संन्यासिनीचे आयुष्य विधवेने जगलेच पाहिजे अशी त्या काळच्या विधवांची समजुत असे. वैधव्य ही दैवी आपत्ती होती. दैवाचा खेळ होता. धर्मकल्पनांप्रमाणे स्त्रीचा विवाह एकदाच होऊ शकत असे. विवाह हा संस्कार होता. संपुर्ण संस्कार संस्काराला दैवी स्वरुप असल्याने तो अमंग मानला जात असे. त्यामुळे मुली बालवयात विधवा झाल्या तरी सुखाचा ओझरता विचारदेखील पापमय वाटे त्यांना आणि मग आपल्या दैवाचा वाटा म्हणुन त्या धर्मकल्पनेला मान देऊन सन्यस्त आयुष्य जगत. धर्मानेही विधवा स्त्रीला बंधनात जखडुन टाकुन तिला पारलौकीक कल्याणाचे प्रलोभन दाखवले होते. धर्माज्ञेप्रमाणे पती मृत झाला असता स्त्रियांस दोन मार्ग उपलब्ध होते. (१) उत्तम प्रकारे वैधव्य पालन करावे किंवा (२) सहगमन करावे.

जी स्त्री पती मरण पावला असता सदोसदी वैधव्य रक्षण करील ती पुन्हा भर्त्याप्रत प्राप्त होउन स्वर्गलोकास जाते. विधवा स्त्रीने सदाचरण पाळावे. सदाचाराचा भंगझाल्यास ती अधोयोनिस जाते व पती सर्वथा स्वर्गलोकापासुन पतित होतो. तिचा पिता, माता व भ्रात-वर्ग हेही पतन पावतात. विधवेचा कबरीबंध म्हणजे केसांचा बुचडा पतीच्या बंधनास कारण होतो म्हणुन सदोसदी केसांचे वपन करावे. सदा एकदा पतीच्या बंधनास कारण होतो म्हणुन विधवेने सदोसदी केसांचे वपन करावे.

सदा एकदा भोजन, उपवास व व्रते आचरण करावीत. पलंगावर निद्रा करणारी स्त्री आपल्या पतीस अधोयोनीस पाडिते. अंगास तैलादी लावु नये. सुगंधी द्रव्यांचे सेवन करु नये, कंठगत प्राण आले तरी वृषभावर बसु नये, काजळ लावु नये, वैशाख, कार्तीक व माघ या मासांत विशेष नियम आचरावेत.

विधवा स्त्रीने मग ती कोणत्या का वयाची असेना तिने सर्व सुखांचा परित्याग करुन सन्यस्त आयुष्य जगावे अशी त्या काळी समाजाने सक्ती केली. तिने म्हणुन चांगले दिसुच नये अशी बंधने तिच्यावर लादण्यात आली. एक भुक्त राहुन उपासतापास करुन तिने शरीर झिजवावे आणि धर्माचे उदात्त आचरण करीत असता देहधर्म विसरावेत, मोहाच्या क्षणांवर विजय मिळवावा अशी यात हेतुपुरस्सर योजना होती. विधवा स्त्री सदाचरणापासुन ढळली तर ती एकटी पतित होते. असे धर्माने म्हटले नाही. ती एकटी पतित होणार असती तर त्या सुखदु:खाचा वाटा तिच्या स्वर्गस्त पतीप्रमाणे जिवंत आईबाप, भाऊ यांनाही उचलावा लागतो अशी भीती घालुन धर्माने विधवेच्या व्रतस्थ आयुष्याभोवती जागते पहारे ठेवले आणि धर्माच्या नावाखाली तिला मनुष्यसुखाच्या साध्या अपेक्षांनाही वंचित केले. इतकेच काय सुखाची कल्पना मनात येणे हे देखील पाप ठरले. पतिप्रेमाने भारावल्याने तिला असे वाटते तर तिचा संयम आदर्श ठरता पण धर्माने तिच्यावर सक्ती केली होती. विधवा स्त्रीने पतिव्रत्यसंरक्षण करावे यासाठी तिच्यावर ही बंधने लादण्यात आली. ही बंधने जाचक आणि व्यक्ती स्वातंत्र्याविरुध्द होती. या बंधनातली पहिली भयंकर सक्ती म्हणजे केशवपन.

पतीच्या मृत देहाबरोबर पत्नीने केस जाळात , पत्नीने वपन करुन केस मृत देहाबरोबर स्मशानात नेले नाही तर ब्राम्हण लोक प्रेताला मंत्राग्नी देण्यास तयार नसत. विधवेने केस डोक्यावरच राखले तर तिच्या पतीचा आत्मा त्या केसांनी ती नरकात बांधुन ठेवते असा सामाजिक विश्वास होता. त्यामुळे पती मेल्याबरोबर स्त्रीचे मुंडन करण्यात येई. त्यानेतर दर पंधरा दिवसांनी घरी न्हावी बोलावुन हा कार्यक्रम गुपचुप उरकुन घेण्यात येई. आठ-नऊ वर्षाची पोर विधवा झाली तर पुष्कळदा ती पंधरा-सोळा वर्षाची झाल्यावर मग तिचे मुंडन करीत.

त्या काळी सर्वत्र सिंधुकारांचे धर्मराज्य चालु होते. त्यामुळे सर्वच कामांसाठी व्रते असत. केशवपनाचाही असा एक विधी असे त्यावेळी धर्म करावा लागे. होम करावा लागे बिचारी विधवा केशवपनाचे दु:खही व्यक्त करायला तिला मोकळी नव्हती. केस तर काढायचेच व दान द्यायचे ब्राम्हणाला. ही केशवपनाची चाल ब्राम्हणांप्रमाणे सोनार व कासारांतही होती. समाजात सर्वत्र कर्मठ ब्राम्हण असत. दंशग्रंथी विद्वान पट्टीचे ब्राम्हण पुष्कळ असत व त्यांचे अनुशंगाने ब्राम्हण अब्राम्हण इत्यादी सर्व जातींचे लोक धार्मिक आचारविचार फार कसोशिने पाळीत असत.

## सती:-

इ.स.च्या दहाव्या शतकापर्यंत भारताच्या दक्षिण भागात सतीचे उदाहरण अगदी क्वचितच आढळे, असे सुलोमन नावाचा अरबी व्यापारी म्हणतो. दहाव्या शतकाच्या सुरुवातीस त्याने बरीच वर्ष भारताच्या पाश्चिम किणाऱ्याकडे वास्तव्य केले होते. तो म्हणतो या प्रदेशाच्या राजधानीत स्त्रिया कधी कधी सहगमन करतात. पण सती जाम्याची त्यांच्यावर सक्ती केली जात नाही. सती जाण्याची उत्कट इच्छा असलेली स्त्रीच फक्त सती जाते.

सतीची पध्दत ही प्रथम क्षत्रिय स्त्रियांनी प्रचारात आणली असली तरी हळुहळु ब्राम्हण विधवाही सती जाऊ लागल्या. महाराष्ट्रात अशी समजुत आहो की, फक्त ब्राम्हण विधवाच सती जात ती मात्र सर्वथैव चुकीची आहे. पद्मपुराणात सतीच्या चालीचे उत्तुंग गोडवे गाईले आहेत. पण ब्राम्हण विधवांना सती जाण्याची सक्त मनाई केली आहे. आणि जो कोणी ब्राम्हण विधवेस सती जाण्यासाठी चित्तेपर्यंत नेण्यास मदत करील त्याला ब्रम्हहत्येचे महापातक लागेल असे म्हटले आहे. पण आपण ऋषिप्रणित धर्माचा अवलंब करतो, आत्मसंयमपुर्वक जीवन जगतो, समाजाला वैराग्याचे, ज्ञानाचे पाठ घालुन देतो, आदर्श घडवितो असा स्वजातीविषयी अभिमान बाळगणाऱ्या ब्राम्हण स्त्रिया शतकापासुन काही ब्राम्हण विधवाही सती जाऊ सागल्या आणि या कालखंडातील धर्मशास्त्राचे टीकाकार शास्त्रवचनांचा अर्थ निराळ्या पध्दतीने लावु लागले. ब्राम्हण स्त्रीस चितान्वारोहणास बदी आहे याचा र्थ तिने क्षणिक दु:कातिरेकाच्या आहारी जाऊन आत्मघातक प्रवृत्त होऊ नये; इतकेच. सती जाण्याचा निर्णय तिने पुर्ण विचारांती घ्यावा.

अमुक एका जमातीतल्याच विधवेने सती जावे, असे नव्हते. ब्राम्हणापासुन चांडाळापर्यंत कोणत्याही जातीतील स्त्रीने अन्वारोहण करावे अशी शास्त्राची परवानगी होती. शास्त्राने फक्त सती जातेसमयी ती स्त्री गर्भवती नसावी, तिची मुले लहान

म्हणजे दहा वर्षाच्या आतील नसावीत. ती स्त्री वयात आलेली ऋतुमती असावी. आणि सहगमनाचे वेळी ती रजस्वला नसावी असे म्हटले. असे असले तरी सतीच्या पध्दतीला उचलुन धरता धरता धर्मशास्त्राने मग साऱ्याच नियमांत फेरबदल केलेला आढळतो.

सुखाच्या बेजबाबदारीचा वाटा पुरुषांना देऊन निस्सिम त्यागाचा जबाबदारीचा डोंगर मध्ययुगातील धर्मशास्त्राने स्त्रीच्या डोक्यावर ठेवला सतराव्या शतकानंतर लिहिलेल्या "धर्मसिंधु" आणि "निर्णयसिंधु" या ग्रंथात सतीविषयक बारीक तपशील पाहावयास मिळतो. त्या अर्थि या काळात त्या तपशिलाची जरुर होती.

महाराष्ट्रात यादव कालापासुन आंग्लाई आली त्या काळापर्यंत सर्व जमातींत सतींची उदाहरणे सापडतात. त्यात बरीच विविधताही आहे. सक्तीने सती जाणारी स्त्री, प्रेमातिरकाने सती जाणारी स्त्री, धर्मकल्पनेने भारावुन सती जाणारी स्त्री, सती जाणारी गर्भवती स्त्री आणि आप्तेष्ठांच्या प्रेमाला सती न जाण्याच्या आग्रहाला धुडकावुन सती जाणारी स्त्री आणि स्त्रीत्वाला सुखाचा जन्म होताच त्या सुखावह सर्वस्वपणाने चिता चढणारी स्त्री.... सतीची अशी निरनिराळी रुपे मराठी इतिहासाने नमुद करुन ठेवली आहेत.

महाराष्ट्रातील राजघराणी आपण रजपुतांचे वंशज वंशज आहोत असे मानीत त्यामुळे राजपुतान्यातील सतीच्या चालीपासुन येथील राजघराण्यातील मराठा स्त्रिया अलिप्त राहु शकल्या नाहीत. पण महाराष्ट्रातील राजघराण्यातदेखील सती जाणे हा नियम नसुन सतीची उदाहरणे अपवादातच सापडतात. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर त्यांची एकच स्त्री सती गेली. राजारामाच्या बाबतीत हेच घडले आणि शाहुमहाराजांच्या पत्नीवर सती जाण्याची सक्ती झाली. सातारा, नागपुर, ग्वाल्हेर, इंदुर आणि बडोदा या मराठा राजघराण्यात सतींची उदाहरणे क्वचितच घडली. पेशव्यांच्या घराण्यात चिमाजीअप्पाची दुसरी पत्नी अन्नपुर्णाबाई व थोरल्या माधवरांची पत्नी रमाबाई या दोघीच सती गेल्या. महाराष्ट्रात सतीची चाल एवढी लोकप्रिय नव्हती असे म्हटले जाते. पण मुल लहान असता स्त्रीला सती जाता येत नसे, या कारणांमुळे ही संख्या राजघराण्यात कमी असावी.

सती जाण्याची सक्ती सामान्य स्त्रियांवरच होई असे नाही. यादवकालापासुन पेशवाईपर्यंत अशी उदाहरणे राजघराण्यात देखील सापडतात. खुद्द रामदेवराव यादवाच्या मृत्युनंतर कामाइसेचा सावत्र मुलगा सिंघण याने तिच्यावर जबरदस्ती केल्यामुळे सहगमन करण्याची तिची इच्छा नसताना केवळ नाइलाजाने तिला सती जावे लागले. दुसरे उदाहरण शाहुमहाराजांची राणी सकवारबाई हिचे, सकवारबाई संगम माहुली येथे सती गेली. व दोन नाटक शाळा बरोबर गेल्या. तिसरे दिवशी दुसरी राख सखु सती गेली. त्यांचे दहन करुन नंतर प्रतिनिधी व अष्टप्रधान सर्व मिळोन त्यांचे नावाची पाषाणाची लिंगप्रतिमा साळोंका घडोन वेणाकृष्णा उभयसंगमी वाळुवर लिंग ठेवुन त्याची प्राणप्रतिष्ठा करुन येथे स्थापना केली.

सकवारबाईला सती जाण्याची इच्छा नव्हती तेंव्हा बाळाजी बाजीरावाने तिच्या भावाला कैद करुन आणले व त्याच्याकडुन सकवारबाईला सती पाठविण्यासाठी बळजबरीने कबुल करवुन घेतले. विधवेचे निकटवर्ती आप्तेष्ट तिला अग्निप्रवेश करणे भाग पाडीत. सकवारबाईच्या भावाच्या हाताने सकवारबाईला शाहुराजांच्या पादुकांच्या सरणावर पेशव्यांनी जिवंत जाळविली. असे नीच कृत्य करण्यापेक्षा तिला उघड फाशी दिले असते तर ते पुरुषार्थाला शोभले तरी असते. अशा आशयाचा दोष सकवारबाईच्या सती जाण्यासंबंधाने ग्रँट डफने नानासाहेब पेशव्याला दिला आहे. ग्रँट डफच्या म्हणन्यावर रियासतकार सरदेसायांनी पेशव्यांची बाजु मांडली आहे ती अशी....

(१) सकवारबाईस सती जाण्याचा निरोप पाठविण्यात एकटा पेशवा प्रमुख नसुन त्या वेळी जमलेल्या सर्व प्रमुख मंडळीचा त्यात भाग होता. किंबहुना त्यात ताराबाईच अग्रेसर होती.

(२) ही चाल हल्ली कितीही क्रुर आणि वेडगळ भासत असली तरी त्या वेळी ती प्रचलीत होती. बहुधा सती जाणे हा नियम व न जाणे हा अपवाद समजला जाई. न जाण्यास योग्य प्रांपचिक कारणे असतील तर ती निराळी. एरवी जिला असे काही कारण संभवत नसे तिची साहजिक प्रवृत्ती सती जाण्याकडे कोणी न सांगताच होत असे.

(३) राजे लोकांच्या वैभवाचे व सत्कीर्तीचे वर्णन करीत असता त्यांच्या शवाबरोबर किती बायका व दासी सती गेल्या हेही मुद्दाम सांगण्यात येई. वैभवाचे व सुकीर्तीचे अनुमान करण्यास हे एक गमक मानन्यात येई. हे विधान विशेषताः राजपुतान्यास सर्वथा लागु होते. उदेपुर येथील राजांशी बरोबरी किंबहुना वरचढ करण्याची शाहुला हौस होती. हिंदुधर्मासाठी तु काय केलेस, मी काय केले असा त्यांचा जयसिंगाशी वाद झालेला होता.

(४) सकवारबाईच्या वयाला पन्नाशी उलटली असावी . तिला मुल वगैरे पाश काही एक नव्हता. तिचा प्रपंच झालेला होता. शाहुला आता दुसरी राणी सती जाणारी नव्हती. तेंव्हा या राणीने सती जाणे शाहुच्या लौकीकाला त्या काळी साजेसे व जरुरही होते.

(५) धनी मेल्यावर त्याच्या कीर्तीस कलंक लागेल अथवा कमीपणा येइल असे त्याच्या स्त्रीने वर्तण करणे हे नानासाहेबासच काय पण शाहुच्या कोणत्याही नोकरास रुचणारे नव्हते. सती जाण्याचा निश्चय आगाऊ महिना दोन महिने सर्व राज्यात जाहीर करुन आयत्या वेळी आपम सती जात नाही असे सकवारबाईने म्हणणे, जन्मभर सहधर्मचारीणीचे वैभव भोगुन, नवऱ्यास परलोकी प्रवासात एकटाच सोडुन इहलोकी केवळ बखेडे करण्याची हौस पुरविण्याकरीता शाहुच्या विधवेने, जिला मुलबाळ नाही व जी वृध्द झालेली अशा स्त्रीने सती न जाणे हे कोणासच त्या वेळी पसंत पडण्यासारखे नव्हते. मृताविषयी लोकांत जी पुज्यबुध्दी असते तिला असल्या कांगाण्याने धक्का बसतो, त्यात मृताची चेष्टा केल्यासारखे होते.

रियासतकारांच्या म्हणण्याला पुष्टीच द्यायची असेल तर आणखी असेही म्हणता येईल की, शाहुच्या घराण्यात सतींची परंपरा डावलुन , जगण्याचा हट्ट करण्याचे सकवारबाईस, तात्कालीन समजुतीप्रमाणे, काहीच कारण नव्हते.

शाहाजीराजांच्या पाश्चात मातुश्री जिजाबाईंच्या मनात सती जावयाचे फार होते, पण शिवाजीमहाराजांनी अत्याग्रह करुन त्या कृत्यापासुन परावृत्त केले, म्हणुन त्या वैधव्यदशेत जगल्या. शिवाजी महाराजांची पत्नी पुतळाबाई ही महाराजांच्या मृत्युनंतर २७ जून १६८० रोजी सती गेली. शिवाजी महाराजांचा जावई महादजी नाईक निंबाळकर, संभाजीच्या आज्ञेने १६-८५-८६ त फौज घेवुन गोवळकोंड्याच्या मदतीस गेला असता औरंगजेबाने कुटुंबासह पकडून मरेपर्यंत ग्वाल्हेर किल्यात प्रतिबंधात ठेविले. त्याची स्त्री म्हणजे महाराज व सईबाई यांची पत्नी अंबिकाबाई विशाळगडी होती. महाराजांच्या मृत्युची बातमी येताच महाराजांचे पागोटे वक्षी धाऱण करुन बाईंनी सहगमन केले. शाहुची बहिण आणि संभाजी व येसुबाई यांची मुलगी भवानीबाई महाडीक, हिच्यावर शाहुची आत्यंतिक माया होती. इ.स. १७२८ त हिचा नवरा शंकराजी वारला तेंव्हा हिने सहगमन केले. अशी या घराण्यातल्या स्त्रियांच्या सतीची परंपरा दिव्य होत. ती दिव्य परंपरा जगण्याच्या क्षुद्र वासनेने डागळु नये असे त्या वेळी सकवारबाईच्या आप्तेष्टांना वाटणे साहजिक होते.

**संदर्भग्रंथ सुची:-**

सरदेसाई गो.सं. मराठी खंड ४ पृ. ५२
कित्ता पृ. ५४
लो. टिळकांचे केसरीतील लेख भाग ४ पृ. २७६
थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी भाग २ पृ. २१०
पेशवे दप्तरातून निवडलेले कागद क्र. ४३ पृ. १३३
कित्ता पृ. १३४
गो. सरदेसाई – ऐतीहासीक पत्रव्यवहार पृ. ४
कित्ता पृ. ४७
मराठी दप्तर रुमाल २ पृ. १८
कित्ता पृ. १९